# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

दूरध्वनी क्र. ०२०–२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स ०२०–२५६९७५११


संदर्भ: विक्रीमं/३/५२ दिनांक: १६ मे, २०१८.

**प्रति,**
**मा. प्राचार्य/ मा. संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये**
**तसेच मान्यताप्राप्त संस्था,**
**(अहमदनगर जिल्हा, नाशिक जिल्हा व**
**पुणे जिल्हा कार्यक्षेत्र)**

**विषय : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित Run For Tree – Tree For Life स्पर्धेबाबत..**

**संदर्भ : अ/साववि/राहसे/१०१/२०१७–१८ दि. १४ मे, २०१८**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणांस या पत्राद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाचे सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांनी सुचित केल्यानुसार जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून या मॅरेथॉन स्पर्धेचे दि. ०३ जून, २०१८ रोजी आयोजित **Run For Tree – Tree For Life** स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालय/संस्थेमधील खेळाडूंना सहभागी होण्याबाबत सूचित करण्यात यावे. या स्पर्धेकरीता रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. तरी आपल्या महाविद्यालय/संस्थेमधील खेळाडूंच्या निदर्शनास सदर बाब आणून जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, ही विनंती.

धन्यवाद! सहकार्याची अपेक्षा!

कळावे,

आपला,

**डॉ. दिपक माने**
**संचालक,**
**क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ,**
**अधिष्ठाता, आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा**

**सोबत: महाराष्ट शासनाचे संबंधित विषयाचे पत्र क्र. अ/साववि/राहसे/१०१/२०१७–१८ दि. १४ मे, २०१८.**

विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचे कार्यालय
स.नं. 49, वनवसाहत,नरेनहिल बिल्डींग समोर,साळुंखे विहार जवळ, वानवडी, पुणे -411022
दुरध्वनी क्र.020-24333119 फॅक्स क्र. 02024333119
EMAIL- dydirsfdpune@gmail.com

**विषय** :- शासनाच्या वतीने "Run For Tree" या मॅरेथान स्पर्धेचे आयोजन करणेबाबत..

**जा.क्र.**अ/साववि/ राहसे / 101 /2017-18
**पुणे** - 411022 दि. 14-5-2018

प्रति,
डॉ. दिपक माळी
क्रिडा संचालक
सा. फुले पुणे विद्यापीठ, पुणे

पर्यावरण रक्षणाचे दृष्टीने जास्तीत जास्त वृक्षलागवड करुन पर्यावरणाचे रक्षणाचे दृष्टीने एकुन भुभागाचा 33% वृक्ष क्षेत्र वृक्षाच्छादिन करणेचे दृष्टीने वाटचाल करण्यासाठी शासनाने वृक्ष लागवड कार्यक्रम सर्वोच्य प्रथामिकता दिली आहे. या कार्यक्रमाचा पुढील भाग म्हणून सन -2018 मध्ये 13 कोटी वृक्ष लागवडीचे व सन 2019 मध्ये 33 कोटी वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्र शासनाचा हा प्रथम प्राधान्य कार्यक्रम असुन मा.मंत्री (वने ) सचिव (वने ) वनविभागाचे सर्व उपविभाग यांचे स्तरावर या कार्यक्रमाचे अत्यंत सुक्ष्म नियोजन करण्यात येत आहे.

या महत्वकांक्षी कार्यक्रमास जिल्हास्तर तालुकास्तर,विभागास्तरावरील इतर सर्व यंत्रना अंशासकिय संस्था,स्वयंसेवा संस्था,विविध संघटना,शाळा महाविदयालय,डॉक्टर्स संघटना,पर्यावरण संघटना व व्यक्ती,लोकप्रतीनिधी या सर्वाना सहभागी करुन कार्यक्रम यशस्वी करण्याचा दृढ निश्चय शासनाने केला आहे.

जगण्यास प्राणवायू हवा व त्यासाठी वृक्ष लागवड हवी आहे हे सर्वानाच जाणवायला लागले आहे.जास्तीत जास्त लोकांना शासनाच्या या 13 कोटी वृक्ष लागवड योजनेमध्ये सहभागी व्हावे यासाठी जनजागृती व्हावी यासाठी शासनाच्या वन विभागाच्या वतीने 5 जुन जागतीक पर्यावरण दिनांचे औचित्त साधून Run For Tree. Tree For Life या मॅरेथान स्पर्धेचे दिनांक -3 जुन 2018 राजी अयोजन करण्यात आले आहे.हिरव्यागार वृक्षराजनी नटलेल्या कृषी महाविदयालय,पुणे शिवाजीनगर पुणेच्या मैदानावर दिनांक-3-जुन -2018 रोजी सकाळी 6.00 वा स्पर्धेस सुरवात होईल.

या स्पर्धसाठी विविध गट व पारितोषके खालील प्रमाणे आहेत .

1. खुला गट –महिला व पुरुष (स्वतंत्र) : 21 कि.मी.
   प्रथम पारितोषक :- रु- 40,000/-
   व्दितीय पारितोषक :- रु- 30,000/- (महिला व पुरुष गटसाठी स्वतंत्र पारितोषक )
   तृतीय पारितोषक :- रु – 20,000/-

2. खुला गट -- महिला व पुरुष (स्वतंत्र) 11 कि.मी
   प्रथम पारितोषक :- रु- 30,000/-



Notice Board
15.5.18

व्दितीय पारितोषक :- रु- 20,000/- (महिला व पुरुष गटसाठी स्वतंत्र पारितोषक )
तृतीय पारितोषक :- रु – 10,000/-

3. खुला गट -- महिला व पुरुष (स्वतंत्र) 5. कि.मी
प्रथम पारितोषक :- रु- 10,000/-
व्दितीय पारितोषक :- रु- 7,000/- (महिला व पुरुष एकत्र )
तृतीय पारितोषक :- रु – 5000/-
4. Run For Tree ( FAMILY RUN ) :- 1 ते 3 कि.मी.
या गटासाठी पारीतोषिके नाहीत.

प्रामुख्याने शासनाने ठरवून दिलेल्या13 कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्टपुर्तीच्या जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्याज आलेल्या या मॅरेथॉन स्पर्धतील विजेत्याना वरील प्रमाणे आकर्षेक पारीतोषिके,पदके,प्रत्येक सहभाग स्पर्धकास शासनाच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र व टोपी देण्यात येणार, असल्याने पर्यावरणवर प्रेम करणा-या जगण्यासाठी प्राणवायू मिळवू इच्छिणा-या सर्व आबांलवृध्दानी या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे असे शासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे . या स्पर्धेत पुणे परीसरातील सर्व शासकिय, निमशासकिय कार्यालयातील कर्मचारी ( केंद्र व राज्य सरकरची ) सर्व अशासकीय संस्था व प्रतिनिधी नामांकित संस्था पुणे स्थित वैदयकिय क्षेत्रातील सर्व डॉक्टर्स, व त्यांच्या संघटना, सर्व रुग्णालये व त्यांचे कर्मचारी,राष्ट्रीय संरक्षण प्रबोधनी (NDA) सर्व विदयापीठे,सर्व महाविदयालये,सर्व शाळा, राज्यराखीव पोलीस बल,(SRPF),विविध स्पोर्टर्स क्लब,फिटनेस क्लब,सर्व वृत्तपत्रे मिडीया या व अशा सर्व स्तरावरील व्यक्तिंचा भरीव सहभाग अपेक्षेत आहे.

स्पर्धसाठी गट निहाय नोंदणी शिल्क खालील प्रमाणे असुन हरित सेनेच्या (Green Army ) सदस्यांना नोंदणीमण्ये 50% सवलत आहे.

| अ.क्र | कि.मी. | नोंदणी शुल्क | (हरित सेना सभासत असल्यास ) |
|---|---|---|---|
| 1. | 21 कि.मी गट. | रु-500/- | रु-250/- |
| 2. | 11 कि.मी गट | रु-300/- | रु- 150/- |
| 3. | 5 कि.मी गट | रु-100/- | रु-50/- |

चला तर मग लवकर Green Army चे सदस्य व्हा व सवलतीचा लाभ उठवा Green Army चे सदस्य होण्यासाठी www.greenarmy.mahaforest.gov.in या संकेतस्थळावरती भेट दया.

स्पर्धेचा मार्ग खालील प्रमाणे राहील.

1. 21.कि.मी.- कृषी महाविदयालय ग्राऊंड,ई स्केअर,सावित्रीबाई फुले विदयापीठ सर्कल,पाषाण सर्कल,बावधान पोलीस चौकी,चांदणी चौक,पौंड रोड,कोथरुड पोलीस चौकी,अभिनव चौक,(नळ स्टॉप)
कर्वे रोड,गरवारे हायस्कूल,संभाजी पुतळा, गुडलक चौक,ज्ञानेश्वर पादुका चौक,एफ.सी.रोड,कृषी महाविदयालय

2. 11.00 कि.मी.-कृषी महाविदयालय ग्राऊंड,ई-स्केअर,सावित्रीबाई फुले विदयापीठ सर्कल, पाषाण सर्कल सावित्रीबाई फुले विदयापीठ सर्कल ,ई स्केअर,कृषी महाविदयालय ग्राऊंड
   सर्वांनी माठया प्रमाणावर

3. 0.5. कि.मी.-कृषी महाविदयालय ग्राऊंड,म्हसोबा गेट,ई स्केअर,सावित्रीबाई फुले विदयापीठ सर्कल,चतुश्रृंगी,जे डब्लू मॅरीयट,ओम सुपर मार्केट,सिंबायोसिय, डिंस्टंट,लनिंग कॉलेज, ई-स्केअर,कृषी महाविदयालय ग्रांऊड.

सर्वाना मोठया प्रमाणावर सहभागी व्हावे.आपल्या लहानग्यांनाही सामील करुन घ्या. आपणासोबत सिने क्षेत्रातील क्रीडा क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिश सहभागी होत आहेत.चला तर मग आपल्या अरोग्यासाठी आपल्या श्वासासाठी भविष्यासाठी सहभागी व्हा." Run For Tree. Tree For Life "मॅरेथानमध्ये

(बी.व्ही.जगझाप)
**विभागीय वन अधिकारी,**
**सामाजिक वनीकरण विभाग, पुणे**

Link- ① https://www.meraevents.com/event/run-for-trees-2018-an-initiative-by-pune-forest-department?ucode=organizer

② https://www.townscript.com/e/run-for-trees-2018-321022